RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ८९

दि.२८ जुलै २०२६, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# आरक्षण उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ लातुरात अभूतपूर्व महामोर्चा

## सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उपवर्गीकरणाची तात्काळ अंमलबजावणी करा मोर्चेकऱ्यांची जोरदार मागणी

**लातूर/ प्रतिनिधी:** अनुसूचित जातींमधील आरक्षणाचे उपवर्गीकरण सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तात्काळ लागू करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी सोमवारी लातूर शहरात समस्त मातंग समाज व अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण संघर्ष समिती, लातूर जिल्ह्याच्या वतीने भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले. या महामोर्चाला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून महिला, पुरुष, युवक-युवतींसह ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उपस्थितीच्या दृष्टीने हा मोर्चा यापूर्वी झालेल्या सर्व मोर्चांपेक्षा अधिक भव्य ठरल्याची चर्चा शहरात होती.

साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करून अण्णाभाऊ साठे चौकातून महामोर्चाला सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गांवरून शिस्तबद्ध पद्धतीने मार्गक्रमण करत हा मोर्चा



जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथे पोहोचला. संपूर्ण मार्गावर घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. मोर्चामध्ये विविध महापुरुषांच्या प्रतिमा, संविधानाच्या मूल्यांचा गौरव करणारे फलक, तसेच आरक्षण उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करणारे फलक सहभागींच्या हातात झळकत होते. युवक-युवतींनी मोठ्या उत्साहाने आणि आक्रमक भूमिकेत सहभाग नोंदवत सामाजिक न्यायाच्या मागणीला बुलंद आवाज दिला.

मोर्चेकऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार अनुसूचित जाती



आरक्षणाचे उपवर्गीकरण तातडीने लागू करावे, अशी ठाम मागणी केली. आरक्षणाचा लाभ अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व घटकांपर्यंत समतोलपणे पोहोचण्यासाठी उपवर्गीकरण आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या महामोर्चामध्ये लातूर जिल्ह्यातील मातंग समाजासह अनुसूचित जाती प्रवर्गातील ५९ जातींचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधवांनी एकजुटीचे दर्शन घडविले.

महामोर्चानंतर जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथे प्रतिनिधी मंडळाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले. या निवेदनात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण तात्काळ लागू करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. निवेदन सादर करताना संघर्ष समितीचे प्रमुख पदाधिकारी, विविध संघटनांचे प्रतिनिधी आणि समाजबांधव उपस्थित होते.

संपूर्ण मोर्चा शांततापूर्ण वातावरणात पार पडला असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस प्रशासनाने ठिकठिकाणी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. या महामोर्चामुळे लातूर शहरात सामाजिक न्यायाच्या प्रश्नावर पुन्हा एकदा व्यापक जनजागृती झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# आरतीमुळे समाजात भक्ती आणि एकतेची भावना वाढते

### ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगावकर यांचे विचार




**लातूर/ प्रतिनिधी:** चंद्रभागेच्या आरतीमुळे केवळ धार्मिक विधीच होत नाही, तर समाजात भक्ती, श्रद्धा आणि एकतेची भावना वाढते. डॉ. विश्वनाथ कराड यांनी सुरू केलेली ही आरतीची प्रथा वारकऱ्यांचे मन परिवर्तन करते. सामूहिक आरतीमुळे हजारो भाविक, वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.असे विचार ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगावकर यांनी व्यक्त केले.

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत, श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीच्या वतीने पवित्र चंद्रभागेची आरती या नित्य उपक्रमाचा एक भाग म्हणून आषाढ शुद्ध एकादशीच्या पूर्व संध्येला पंढरपूर येथील भक्त पुंडलिक घाटावर ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगावकर यांच्या हस्ते चंद्रभागेची आरती संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी सौ. उषा विश्वानाथ कराड, गोदावरीताई मुंडे, प्रा. स्वाती कराड चाटे, संजीवनी कराड आणि प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगावकर म्हणाले, या आरती मुळे भक्तांमध्ये सेवा भाव अधिक निर्माण होतो. प्रत्येकांची सेवा करने ही आम्हाला संतांनी दिलेली शिकवण आहे. त्यामुळे त्यांच्या पाऊलांवर चालणे हे सर्व वारकऱ्यांचे कर्तव्य आहे. आज संपूर्ण जगात संत ज्ञानेश्वर व तुकाराम महाराज यांचा संदेश पोहचले आहे. वारकरी संप्रदायाची परंपरा विनम्रता शिकविते. चंद्रभागा आरती ही पंढरीची ओळख आहे. या परंपरेच्या माध्यमातून घराघरात भक्ती वाढते आणि माऊलींचे विचार पुढच्या पिढीपर्यंत पोहोचतो.

ह.भ.प. शालिग्राम खंदारे यांनी सूत्रसंचालन केले.

## वर्ध्यात दहशत! १० गावांत हाय अलर्ट जारी; वनविभाग ॲक्शन मोडमध्ये

**वर्धा/प्रतिनिधी** : महाराष्ट्र आणि देशपातळीवर वन्यजीवांच्या वाढत्या वावरामुळे मानवी वस्त्यांवर आणि शेती परिसरांवर संकट ओढवल्याचे अनेकदा पाहायला मिळते. सध्या वर्धा जिल्ह्यातून एक अत्यंत महत्त्वाची आणि धास्ती भरवणारी बातमी समोर येत आहे. जिल्ह्यातील वाठोडा शिवारात एका तरुण नर वाघाचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी आणि अनुचित प्रकार घडू नये म्हणून प्रादेशिक वनविभाग पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आला असून, परिसरातील तब्बल १० गावांमध्ये खबरदारीचा इशारा (हाय अलर्ट) जारी करण्यात आला आहे.

वनविभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार, हा मुक्तसंचार करणारा वाघ अंदाजे ३ वर्ष वयोगटातील तरुण नर आहे. त्याच्या सुरक्षिततेसाठी आणि परिसरातील नागरिकांच्या संरक्षणासाठी प्रादेशिक वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी दिवस-रात्र परिसरातील जंगल पिंजून काढत आहेत. अत्याधुनिक यंत्रणेद्वारे आणि प्रत्यक्ष गस्तीव्दारे या वाघाच्या प्रत्येक हालचालीवर अत्यंत बारीक लक्ष ठेवले जात आहे. ज्या १० गावांमध्ये हा हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# कोरडा दिवस पाळूया - डेंग्यू आजार पळवूया

**लातूर/ प्रतिनिधी:** डेंग्यु ताप प्रतिबंधात्मक उपाययोजनाच्या अनुषंगाने लातूर शहर महानगरपालिकेमार्फत दि. २७/०७/२०२६ ते ०८/०८/२०२६ या कालावधी मध्ये आयुक्त राहुल कुलकर्णी यांच्या सूचनेनुसार तसेच अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण शहरात अबेट मोहीमेचा दुसरा राउंड राबविण्यात येत आहे. शहरातील एकूण अपेक्षीत घरसंख्या ८३२५७ आहे. या सर्व घरामध्ये कंटेनर तपासणी करुन डास अळी आढळून आलेल्या कंटेनर मध्ये ॲबेट टाकण्यात येणार आहे व आरोग्य शिक्षण देण्यात येणार आहे. डेंग्यु हा आजार एडिस एजिप्ताय या डासाच्या मादीच्या चावण्यामुळे होते, या डासाची उत्पती रांजण, हौद, पाण्याच्या टाक्या, कुलर्स, कारंजे, फलदाण्या इ. ठिकाणच्या स्वच्छ पाण्यात होते. घराभोवतालच्यां परिसरात अडगळीच्या वस्तुमध्ये विशेषतः जुन्या टायर्समध्ये साठवलेल्या पाण्यात हे डास वाढतात.

डेंग्यु आजार टाळण्याकरीता काळजी घ्यावीः-

याकरीता आठवड्यातून एक दिवस पाण्याचा साठा असलेल्या सर्व भांडी रिकामी करून घासून पुसून कोरडी करा, घरातील सर्व पाणी साठे झाकून ठेवा, झाकण नसल्यास कापडाने झाका. डासांपासून



संरक्षणासाठी घराच्या खिडक्यांना जाळ्या बसवा व झोपताना मच्छरदाणीचा वापर करा, तापात ॲस्पिरीन किंवा ब्रुफेन अशी औषधे घेणे टाळा ती धोकादायक ठरू शकतात, ताप येताच प्रा.ना.आ.केंद्र अंतर्गत वैद्यकीय अधिकारी यांचा सल्ला घ्यावा, कोणताही ताप अंगावर काढू नका.

चला, आपल्या सभोवतालचा परिसर आहे. स्वच्छ. करण्याचा संकल्प करूयाः-

आठवड्यातून एकदा हे नक्की करा. घराभोवती ज्या मध्ये पावसाचे पाणी साचू शकेल अशा निरुपयोगी वस्तू ठेवू नये, त्या नष्ट कराव्यात. फुलदाणी, कुंडी मनीप्लान्ट इत्यादीतील पाणी नियमित बदलावे. परिसरातील डबकी वाहती करावी. नाले स्वच्छ करावेत. ड्रम किंवा इतर पाण्याची भांडी पुर्णपणे रिकामी करावीत. स्वच्छ धुतल्या नंतर भरून झाकण लावावे. या २ महिन्याच्या कालावधीमध्ये आवकाळी पाऊस पडून त्याचे पाणी साचुन राहण्याची शक्यता असते, त्यामुळे शाळा, महाविद्यालये, शासकीय - निमशासकीय कार्यालये, सार्वजनीक संस्थांच्या इमारती इ. आस्थापनांनी त्यांच्या इमारती व परिसरामध्ये पाणी साचुन राहणार नाही यांची दक्षता घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. तरी या मोहिमेत एकूण ८ नागरी आरोग्य केंद्रातील कर्मचारी आणि आशा स्वयंसेविका यांचे मार्फत राबविण्यात येत आहे. यासोबतच ताप रुग्ण सर्वेक्षण करून, ताप असणाऱ्या रुग्णांचे रक्तनमुने तपासणीसाठी घेऊन तपासणी करण्यात येणार आहे. तरी ॲबेट मोहिमेत घर भेटीस येणा-या आरोग्या कर्मचा-यास सहकार्य करावे असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभाग, मनपा लातूर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

जानेवारी ते जून २०२६ डेंग्यू आकडेवारी खालील प्रमाणे

एकूण तपासणी केलेले रक्तजल नमुने - २१८
डेंग्यू positive रुग्ण- ०८
चिकनगुनिया positive- ०१

## रॉ अधिकारी असल्याचे भासवून लाखोंची खंडणी मागणारा जेरबंद

राजकोटः गुजरातमधील राजकोट येथील एका धान्य व्यापाऱ्याचे बँक खाते ऑनलाईन व्यवहारानंतर गोठवून,स्वत:ला 'रॉ'अधिकारी असल्याचे भासवत खाते सुरू करून देण्यासाठी सव्वा चार लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या परेश प्रवीण कोठारी (वय ४२,रा. सातारा रस्ता,पुणे)याला पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाने अटक केली.या प्रकरणी पर्वती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदाराच्या खात्यात वेगवेगळ्या खात्यांतून चार हजार रुपये जमा झाल्यानंतर बँक खाते गोठविण्यात आले.चौकशीत हे व्यवहार पुण्यातील खात्यांतून झाल्याचे समोर आले.त्यानंतर संशयिताने व्हॉट्सॲप कॉलद्वारे संपर्क साधत स्वत:ला 'रॉ'अधिकारी असल्याचे सांगितले आणि खाते सुरू करण्यासाठी सुरुवातीला पाच लाख,नंतर तडजोडीनंतर सव्वा चार लाख रुपयांची मागणी केली.पैसे न दिल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील,अशी धमकीही दिली. तक्रारदाराने वकिलांच्या सल्ल्याने गुन्हे शाखेकडे तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी सापळा रचला.सातारा रस्त्यावरील पंचमी चौक परिसरात खंडणीची रक्कम स्वीकारण्यासाठी आलेल्या परेश कोठारीला रंगेहात अटक करण्यात आली असून पुढील तपास पर्वती पोलीस करत आहेत.

# लातूर येथील सीआरपीएफ आरटीसीमध्ये ८८ वा स्थापना दिन उत्साहात साजरा





**लातूर/ प्रतिनिधी:** केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या ८८ व्या स्थापना दिनानिमित्त २७ जुलै २०२६ रोजी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या लातूर येथील नवआरक्षी प्रशिक्षण केंद्रात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्राची एकता, अखंडता आणि अंतर्गत सुरक्षेसाठी प्राणांची आहुती देणाऱ्या सीआरपीएफच्या अमर शहीदांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. या प्रसंगी पोलीस दलातील अधिकारी,, जवान, नवप्रविष्ठ आरक्षी तसेच त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस उपमहानिरीक्षक तथा आरटीसीचे प्राचार्य अमीरुल हसन अंसारी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सीआरपीएफच्या गौरवशाली परंपरा, अदम्य शौर्य, शिस्त, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रसेवेप्रती असलेल्या अखंड बांधिलकीचा गौरव केला. देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी पोलीस दलाने दिलेल्या उल्लेखनीय योगदानावर त्यांनी प्रकाश टाकला.

केंद्रीय राखीव पोलीस बल हे देशाच्या अंतर्गत सुरक्षेचे प्रमुख बल असून दहशतवादविरोधी कारवाया, नक्षलविरोधी मोहिमा, शांततापूर्ण निवडणूक पार पाडणे, कायदा व सुव्यवस्था राखणे आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदत व बचाव कार्यात नेहमीच तत्परतेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आले आहे, असे त्यांनी सांगितले.

स्थापना दिनाचे औचित्य साधून अधिकारी व जवानांमध्ये संघभावना, परस्पर समन्वय आणि क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सर्व खेळाडूंनी उत्साहाने सहभाग नोंदवून उत्कृष्ट क्रीडाभावना, शिस्त आणि संघभावनेचे दर्शन घडवले. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या संघांना यावेळी गौरविण्यात आले.

## संपादकीय...

# युवाशक्तीने करुन दाखवले...

पेपरफुटीच्या प्रकरणावरून दिल्लीतील जंतर-मंतर येथे आरंभलेले कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन अखेर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने आणि उर्वरित मागण्यांसंदर्भात लेखी हमी देण्याच्या केंद्राच्या आश्र्वासनाने मागे घेण्यात आले. 'जेन-झी' म्हणवल्या जाणाऱ्या तरुण पिढीच्या संघटित शक्तीचा हा विजय मानला जात आहे. जंतर-मंतरवर ३७ दिवस उन्हापावसाची तमा न बाळगता ठामपणे उभे राहिलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याला आणि समर्थकाला माझा मनःपूर्वक सलाम, अशी प्रतिक्रिया देत कॉक्रोच जनता पार्टीचा संस्थापक अभिजित दीपके याने आंदोलनात सहभागी तरुण-तरुणींचे आभार मानले. उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्रासह देशभरामध्ये विविध ठिकाणी तरुणांनी केलेल्या प्रखर आंदोलनांची धग वाढत चालल्याचे लक्षात आल्याने केंद्र सरकारने हा निर्णय घेतला. राजीनामा टाळण्यासाठी अन्य उपायांबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, पीयूष गोयल, जे. पी. नड्डा, जितेंद्र सिंह आणि धर्मेंद्र प्रधान यांच्यात प्रदीर्घ चर्चा झाली. त्याआधी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनीही पक्षाच्या युवा नेत्यांसोबत बैठक घेतली होती. सर्व चर्चे अंती राजीनाम्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनीही तरुणांशी संवाद साधणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले होते. या राजीनाम्यामुळे देशातील सर्व विरोधी पक्षांमध्ये 'आनंदी आनंद गडे' अशी स्थिती आहे. प्रत्यक्षात कॉक्रोच जनता पार्टीची स्थापना, त्यांचे दिल्लीतील आंदोलन आणि या बॅनरखाली एकवटलेली देशभरातील तरुणाई आणि तिने अहिंसक मार्गाने उभ्या केलेल्या आंदोलनापुढे सरकारला नमते घ्यावे लागले, परीक्षा पद्धतीत त्रुटी राहिल्याचे मान्य करावे लागले आणि त्यासाठी शिक्षणमंत्र्यांचा राजीनामाही घ्यावा लागला. दुसरीकडे ही विरोधी पक्षांचीही सपशेल हार आहे. याचे कारण, २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये २०१९ च्या तुलनेत अधिक जागा मिळवूनही विरोधी पक्षांना जे साध्य करता आले नाही, ते युवाशक्तीने करून दाखवत त्यांच्या डोळ्यांत अंजन घातले. आंदोलन ज्या पद्धतीने हायजॅक करण्याचा प्रयत्न विरोधी पक्षांनी केला तो सबंध देशाने पाहिला. सोनम वांगचुक हे या आंदोलनाचे प्रणेते ठरले. आंदोलनाच्या सुरुवातीच्या काळात गर्दी विखुरलेली होती. वांगचुक यांच्या मंचामुळे आंदोलनाला सामायिक केंद्र मिळाले. त्यामुळे प्रधानांच्या राजीनाम्यानंतर हर्षोल्हासित होऊन या तरुणांचे सत्कार सोहळे आरंभणे म्हणजे विरोधी पक्षांनी आपल्याच पराभवाचा उत्सव साजरा करण्याचा प्रकार! त्यापेक्षा शिक्षण व्यवस्थेतील सुधारणांबाबतच्या उपाययोजनांसाठी सरकारकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजना अधिक प्रभावी कशा ठरतील, यासाठी सकारात्मक पुढाकार घेतल्यास पेपरफुटीसारख्या गैरप्रकारांना आळा बसू शकेल. जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांचा रोष केवळ प्रश्र्नपत्रिका फुटल्यामुळे निर्माण झालेला नव्हता. त्यामागे अनेक वर्षांपासून साचलेली अस्वस्थता, शिक्षण व्यवस्थेतील विसंगती, रोजगाराबाबतची अनिश्र्चितता आणि परीक्षा केंद्रित संस्कृती यांचा मोठा वाटा आहे. देशातील शिक्षणव्यवस्था आजही मोठ्या प्रमाणावर पाठांतर, गुण आणि स्पर्धात्मक परीक्षांभोवती फिरते. विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीचा, सर्जनशीलतेचा, समस्या सोडविण्याच्या क्षमतेचा किंवा नवकल्पनांचा विकास करण्याऐवजी त्यांना परीक्षांसाठी तयार करण्यावर भर दिला जातो. परिणामी, एका परीक्षेवर विद्यार्थ्यांचे भविष्य अवलंबून राहते आणि त्यातूनच पेपरफुटीसारख्या गुन्ह्यांना खतपाणी मिळते. लाखो विद्यार्थी एका प्रश्र्नपत्रिकेच्या पारदर्शकपणावर अवलंबून असतील, तर त्या प्रक्रियेतील छोटीशी त्रुटी समाजात प्रचंड असंतोष निर्माण करणारच. यासाठी परीक्षा घेण्याच्या संपूर्ण प्रक्रियेत तांत्रिक आणि प्रशासकीय सुधारणा करणे अत्यावश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, एन्क्रिप्शन, सुरक्षित डिजिटल वितरण प्रणाली आणि स्वतंत्र देखरेख यंत्रणा यांचा अधिक प्रभावी वापर केल्यास गैरप्रकारांवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवता येईल. केंद्र सरकारने परीक्षांमधील पेपरफुटीचे प्रकार रोखण्यासाठी आणि गुन्हेगारांना कठोर शिक्षा देण्यासाठी सार्वजनिक परीक्षा कायद्यात सुधारणा करणाऱ्या नवीन विधेयकाच्या मसुद्याला मंजुरी दिली आहे. या प्रस्तावित विधेयकात दोषींना १० वर्षांपर्यंतचा तुरुंगवास आणि १० कोटी रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. सोमवारी हे विधेयक सादर करण्यात येणार आहे; पण हाच निर्णय काही दिवस आधी झाला असता, तर प्रधानांच्या राजीनाम्याची नौबत आली नसती. आंदोलनांची हाताळणी करण्याचे एक अलिखित शास्त्र आहे. त्यानुसार आंदोलकांच्या मागण्यांबाबत वेळीच संवेदनशीलता आणि सकारात्मकता दाखवल्यास ते चिघळण्याची शक्यता उरत नाही; पण बहुतेकदा सरकारे आंदोलकांना कमी लेखण्याची चूक करतात. शासनकर्त्यांना ही गोष्ट का समजत नाही, हे एक मोठे कोडे आहे. परिणामी, ठिणगीचा वणवा होतो. खरे पाहता सध्या सरकारमध्ये असणारे बहुतांश नेते अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या मुशीतून आलेले आहेत. धर्मेंद्र प्रधानही १९९० पासून 'अभाविप'चे कार्यकर्ते राहिले आहेत. ते भाजप युवामोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्षही होते. ते कुशल संघटक आहेत. ओडिशामध्ये भाजपचा पाया विस्तारण्यामध्ये त्यांची मोठी भूमिका आहे. तथापि, गेल्या पाच वर्षांपासून ते शिक्षणमंत्री असून याच काळात शिक्षण क्षेत्रात अनेक गैरप्रकार घडले. प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाची अतिरिक्त जबाबदारी सोपवली आहे. कर्नाटकातील धारवाड मतदारसंघाचे पाच वेळा लोकसभेत प्रतिनिधित्व केलेले जोशी हे संघटनात्मक कौशल्य, प्रशासकीय अनुभव आणि समन्वय साधण्याच्या क्षमतेसाठी ओळखले जातात. राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या कार्यपद्धतीत सुधारणा, प्रश्र्नपत्रिकांच्या सुरक्षिततेसाठी अधिक सक्षम यंत्रणा आणि दोषींवर तातडीने कठोर कारवाई या गोष्टींकडे नव्या शिक्षणमंत्र्यांनी प्राधान्याने लक्ष देणे गरजेचे आहे. तत्कालिक संकट हाताळण्याबरोबरच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीची जबाबदारीही त्यांच्यावर असेल. शालेय शिक्षणातील गुणवत्तावाढ, उच्च शिक्षणातील सुधारणा, संशोधनाला चालना, डिजिटल शिक्षणाचा विस्तार आणि केंद्र-राज्य समन्वय अधिक मजबूत करणे या क्षेत्रांत ठोस पावले उचलावी लागतील. किंडरगार्डनपासून विद्यापीठापर्यंत शिक्षणाचा संपूर्ण प्रवास नव्या युगाच्या गरजांनुसार बदलणे ही काळाची अपरिहार्यता आहे. शिक्षणव्यवस्थेच्या पुनर्बांधणीची ऐतिहासिक संधी नव्या शिक्षणमंत्र्यांना आणि सरकारला मिळाली आहे. या संधीचे रूपांतर व्यापक सुधारणांमध्ये झाले, तरच विद्यार्थ्यांचा विश्र्वास पुन्हा दृढ होईल. त्या अर्थाने सरकारसाठी ही 'अग्निपरीक्षा'च ठरणार आहे.

# पुणे शहर व परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तीन प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

- उन्नत सामुहिक वाहतूक मार्ग (एचसीएमटीआर), पुणे अंतर्गत रिंगरोड आणि बोगद्यांचे जाळे प्रकल्पांचे सादरीकरण
- प्रकल्पांना शासकीय जमिनी देण्यासाठी एकत्रित शासन निर्णय काढण्याचे निर्देश
- रिंगरोड प्रकल्पाच्या खासगी भूसंपादनासाठी रोख मोबदला

**मुंबई/प्रतिनिधी :** पुणे शहर व परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी उच्चक्षमता उन्नत सामुहिक वाहतूक मार्ग (एचसीएमटीआर), पुणे अंतर्गत रिंगरोड आणि बोगद्यांचे जाळे हे तीन प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. या प्रकल्पांसाठी शासकीय जमिनींचा आगाऊ ताबा, भूसंपादन आणि प्रकल्पनिहाय प्रशासकीय प्रक्रिया समन्वयाने पूर्ण करून संबंधित पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यातील प्रमुख शहरी वाहतूक प्रकल्पांच्या नियोजन, वित्तीय व्यवस्थापन, अंमलबजावणी, देखरेखीसाठी गठित उच्चस्तरीय समितीची बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव के. एच. गोविंदराज, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी, पुणे महानगर विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त अभिजित चौधरी, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, अति पोलीस आयुक्त मनोज पाटील आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी व अति पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी सादरीकरणाद्वारे प्रकल्पांची माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उच्चक्षमता उन्नत सामूहिक वाहतूक मार्ग (एचसीएमटीआर) हा पुण्याच्या भविष्यातील दीर्घकालीन गुंतवणुकीसाठीचा एक परिवर्तनकारी पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. एचसीएमटीआर व बोगदा प्रकल्प हे पुणे शहराला अधिक कार्यक्षम, वाहतूक सुलभ व आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यात महत्वाची भूमिका बजावणार आहेत. या तीनही प्रकल्पांसाठी लागणारी शासकीय जमीन पुणे महापालिका व पुणे महानगर विकास प्राधिकरण यांना देण्यासाठी एकत्रित शासन निर्णय काढण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावे. तसेच रिंगरोड प्रकल्पासाठी लागणारी खासगी जमीन संपादनासाठी रोख मोबदला देण्यात यावी.

पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उच्चक्षमता सामूहिक वाहतूक मार्ग प्रकल्प उपयुक्त ठरणार आहे. ४३.६० किमी अंतराच्या या प्रकल्पामुळे २५ ते ३० टक्के वाहतूक कमी होणार आहे. यामुळे सर्व मेट्रोमार्गिका जोडल्या जाणार असून रस्त्याची वाहतूक क्षमता वाढणार आहे. त्यामुळे एचसीएमटीआर या प्रकल्पाचे काम लवकर सुरू करुन २०२८ पर्यंत पूर्ण करण्यात यावे. यासाठीचे आर्थिक मॉडेल तयार करून प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. पीएमआरडीएद्वारे राबविण्यात येणारा अंतर्गत रिंग रोड हा प्रकल्प ८३.१२ किमीचा असून यामध्ये ४४ गावांचा समावेश आहे. या अंतर्गत रिंग रोडचे काम पाच टप्प्यात राबविण्यात येणार आहे. यासाठी प्रकल्पाची प्रक्रिया येत्या सहा ते सात महिन्यांत पूर्ण करावी, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. रोख मोबदला देऊन रिंगरोडच्या भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पाताळलोक प्रकल्पाअंतर्गत पुणे शहरात तीन ठिकाणी बोगदे तयार करण्यात येणार आहेत. यामध्ये भोसरी ते उंड्री नवीन विमानतळ (३६ किमी यामध्ये १० किमी एलिव्हेटेड), रामनदी- भूगाव ते राजाराम पूल (८ किमी) आणि तळजाई टेकडी ते पद्मावती-हिंगणे (१.६५ किमी) या बोगद्यांचे प्रस्तावित आहे. या बोगद्यांच्या जाळ्यांचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञ संस्थेची अथवा तज्ज्ञांची मदत घेऊन सर्वंकष सर्वेक्षण करावे, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.




पीएमआरडीएच्या प्रस्तावित नगररचना (टीपीएस) योजनासंदर्भात यावेळी चर्चा करण्यात आली. पीएमआरडीए व पुणे महापालिकेच्या १५ नगर रचना योजना प्रस्तावित असून या योजना रद्द करण्यासंदर्भात पीएमआरडीएने आपल्या स्तरावर प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठविण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

उच्चक्षमता सामूहिक वाहतूक मार्ग (एचसीएमटीआर) वैशिष्ट्ये

एकूण अंदाजे ३६ किमी लांबीचा सहा पदरी उन्नत मार्ग

पुणे शहरातील मध्यवर्ती नागरी भागातून जाणार

प्रकल्पाचा अपेक्षित खर्च बांधकाम खर्च सुमारे ९ हजार कोटी, भूसंपादनासाठी खर्च सुमारे ३ हजार कोटी

सार्वजनिक वाहतुकीशी एकात्मीकरण करणार

एचसीएमटीआरमधील पॅकेज बोपोडी ते सिंहगड रस्ता (१०.५ किमी), सिंहगड रोड ते सोलापूर रोड (१३.२ किमी), सोलापूर रोड ते एअरपोर्ट चौक (१०.२१ किमी), एअरपोर्ट चौक ते बोपोडी (९.१७ किमी).

पीएमआरडीएच्या अंतर्गत रिंगरोडची वैशिष्ट्ये

प्रकल्पाचा एकूण खर्च २५,१५९.८८ कोटी

प्रकल्पाचे टप्पे टप्पा १ सोळू इंटरचेंज ते वडगाव शिंदे (मनपा हद्द) (४.७० किमी लांबी), लोहगाव (मनपा हद्दीपासून) ते वाघोली (७.५६ किमी).

टप्पा २ वाघोली ते कदमवाक वस्ती (९.३६ किमी लांबी)

टप्पा ३ कदमवाक वस्ती ते जांभूळवाडी (२१.४८ किमी)

टप्पा ४ जांभूळवाडी ते भूगाव (१४.२१ किमी)


टप्पा ५ भूगाव ते परंदवाडी (२५.८० किमी)

# लोकशाहीच्या दारात विद्यार्थ्यांचा आक्रोश, आता उत्तर कोण देणार?

## राहुल गांधींचे अमित शाह यांना पत्र : दिल्लीतील आंदोलन, कथित पोलिस बळाचा वापर आणि लोकशाहीच्या उत्तरदायित्वाचा गंभीर सवाल

लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका नव्हेत. लोकशाही म्हणजे प्रश्न विचारण्याचा अधिकार, असहमती व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आणि सत्ताधाऱ्यांना जाब विचारण्याची मुभा. देशातील तरुणाई जेव्हा आपल्या भविष्याशी संबंधित प्रश्न घेऊन रस्त्यावर उतरते, तेव्हा त्या आवाजाकडे सरकारने शत्रू म्हणून नव्हे, तर देशाच्या भवितव्याचा इशारा म्हणून पाहिले पाहिजे. मात्र दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या कथित पोलिसी कारवाईच्या पार्श्र्वभूमीवर काँग्रेसचे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना लिहिलेले पत्र अनेक गंभीर प्रश्न उपस्थित करते. हे प्रश्न केवळ राहुल गांधी किंवा विरोधकांचे नाहीत तर ते देशातील प्रत्येक पालकाचे, प्रत्येक विद्यार्थ्याचे आणि लोकशाहीवर विश्र्वास ठेवणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे आहेत.

२५ जुलै २०२६ रोजी लिहिलेल्या या पत्रात राहुल गांधी यांनी २० जुलै रोजी दिल्लीमध्ये शांततेने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित बळाच्या वापराबाबत उत्तरदायित्व निश्र्चित करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या पत्रानुसार, विद्यार्थी न्याय्य आणि उत्तरदायी शिक्षणव्यवस्थेची मागणी करीत होते. त्यांना ऐकून घेण्याऐवजी सुरक्षा यंत्रणांकडून अश्रुधूर आणि इतर बळाचा वापर करण्यात आला, अनेक विद्यार्थी जखमी झाले आणि महिला विद्यार्थिनींशीही गैरवर्तन झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. सर्वांत गंभीर आरोप म्हणजे पॅलेट गनच्या वापराबाबतचा. १९ वर्षीय विद्यार्थी साहिल लोचब याला पॅलेट लागल्याने त्याची दृष्टी गमावण्याची शक्यता असल्याचा उल्लेखही पत्रात करण्यात आला आहे. या आरोपांची सत्यता, घटनाक्रम आणि जबाबदारी यांची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. कारण आरोप गंभीर असतील तर त्यांची चौकशीही तितकीच गंभीर असली पाहिजे. सत्ताधाऱ्यांनी आरोप नाकारण्यापूर्वी सत्य समोर आणले पाहिजे आणि विरोधकांनी आरोप करताना तथ्यांची जबाबदारी घेतली पाहिजे. लोकशाहीत कोणत्याही पक्षाला सत्यापेक्षा मोठे स्थान नाही.





राहुल गांधी यांनी गृहमंत्र्यांना दोन थेट प्रश्न विचारले आहेत. विद्यार्थ्यांविरुद्ध पॅलेट गनसह घातक बळाचा वापर करण्यास गृहमंत्र्यांनी मंजुरी दिली होती का? नसेल, तर त्यास जबाबदार कोण? तसेच साध्या वेशातील व्यक्ती विद्यार्थ्यांना लाठीने मारताना दिसत असतील, तर त्या पोलिस कर्मचारी होत्या की स्वयंसेवक? त्यांच्या तैनातीला परवानगी कोणी दिली? हे प्रश्न केवळ राजकीय आरोप म्हणून बाजूला सारणे योग्य ठरणार नाही. कारण जर शांततापूर्ण आंदोलनावर खरोखरच अनावश्यक किंवा अतिरेकी बळाचा वापर झाला असेल, तर त्याची जबाबदारी निश्र्चित करणे ही सरकारचीच नैतिक आणि घटनात्मक जबाबदारी आहे आणि जर आरोप चुकीचे असतील, तर सरकारनेही स्वतंत्र चौकशीच्या माध्यमातून सत्य देशासमोर ठेवले पाहिजे. सत्याला चौकशीची भीती नसते.

आज देशातील विद्यार्थ्यांच्या मनात अस्वस्थता आहे. परीक्षा, प्रवेशप्रक्रिया, स्पर्धात्मक परीक्षांमधील पारदर्शकता, पेपरफुटी, रोजगाराच्या संधी आणि शिक्षणाचा वाढता खर्च हे प्रश्न केवळ विद्यार्थ्यांचे नाहीत. हे देशाच्या सामाजिक आणि आर्थिक भवितव्याशी जोडलेले प्रश्न आहेत. एका गरीब कुटुंबातील मुलगा वर्षानुवर्षे अभ्यास करतो. आई-वडील आपल्या कुवतीपलीकडे जाऊन त्याच्या शिक्षणासाठी पैसा खर्च करतात. त्या मुलाला जेव्हा परीक्षा व्यवस्थेवरच विश्र्वास राहात नाही, तेव्हा त्याच्या हातात उरते तरी काय? त्याचा आवाज रस्त्यावर येतो. त्या आवाजाला उत्तर देण्याऐवजी जर त्याच्यावर लाठी उगारली गेली, तर प्रश्न सुटत नाही, उलट तो अधिक तीव्र होतो. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाकडे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहणे सोपे आहे, पण त्यामागील असंतोष समजून घेणे ही खरी राजकीय परिपक्वता आहे. आंदोलनकर्त्यांशी संवाद साधणे, त्यांच्या मागण्या ऐकून घेणे आणि योग्य मागण्यांवर तातडीने निर्णय घेणे हा लोकशाहीचा मार्ग आहे. संवादाचे दरवाजे बंद झाले की रस्ते संघर्षाचे मैदान बनतात.

महात्मा गांधींच्या देशात सत्याग्रहाची परंपरा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून नागरिकांना स्वातंत्र्य, समता आणि न्यायाचा अधिकार दिला. संविधानाने नागरिकाला प्रश्न विचारण्याचा अधिकार दिला आहे. म्हणूनच सरकारवर टीका करणारा विद्यार्थी देशद्रोही ठरत नाही आणि प्रश्न विचारणारा नागरिक शत्रू ठरत नाही. उलट सत्तेला प्रश्न विचारले जातात म्हणूनच लोकशाही जिवंत राहते. परंतु येथे एक महत्त्वाचा मुद्दा आहे. आंदोलनाचा अधिकार हा लोकशाहीचा अविभाज्य भाग असला तरी आंदोलन शांततापूर्ण असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, हिंसा किंवा कायदा हातात घेण्याचे समर्थन कोणत्याही परिस्थितीत करता येणार नाही. मात्र शांततापूर्ण आंदोलन आणि हिंसक जमाव यांच्यात फरक करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. काही व्यक्तींच्या कृत्यामुळे संपूर्ण आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना गुन्हेगार समजणे ही लोकशाहीची पद्धत नाही.

राहुल गांधींच्या पत्रातील सर्वांत महत्त्वाचा संदेश हाच आहे की, 'उत्तरदायित्व कोणाचे? गृहमंत्रालय देशाच्या अंतर्गत सुरक्षेचे सर्वोच्च राजकीय केंद्र आहे. त्यामुळे राजधानी दिल्लीतील कायदा-सुव्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित झाले तर त्यांची उत्तरे देण्याची राजकीय जबाबदारी सरकारची असते. पोलिसांनी कोणत्या परिस्थितीत कोणता निर्णय घेतला, बळाचा वापर का केला, पॅलेट गन वापरण्याचा निर्णय कोणी घेतला, साध्या वेशातील व्यक्ती कोण होत्या ई. या सर्व प्रश्नांची पारदर्शक चौकशी झाली पाहिजे. लोकशाहीत सरकारची ताकद विरोधकांना गप्प करण्यात नसते, तर विरोधकांच्या प्रश्नांना उत्तर देण्यात असते. आजचा विद्यार्थी उद्याचा मतदार आहे. आज ज्या तरुणाच्या हातात पुस्तक आहे, त्याच्याच हातात उद्या देशाची दिशा ठरवणारे मतदानाचे बटन असेल. त्याच्या मनात जर व्यवस्थेविषयी अविश्र्वास निर्माण झाला, तर ती केवळ सरकारची नव्हे, तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थेची हानी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील अस्वस्थता समजून घेणे ही कोणत्याही सरकारची प्राथमिक जबाबदारी असली पाहिजे.

राहुल गांधी यांनी पत्राच्या शेवटी शांततापूर्ण आंदोलन हे कोणत्याही लोकशाहीसाठी अत्यावश्यक असल्याचे म्हटले आहे. सरकारची जबाबदारी आंदोलनकर्त्यांचे संरक्षण करणे आणि संवादातून त्यांच्या तक्रारी सोडवणे ही आहे, असा त्यांचा मुद्दा आहे. हा विचार पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन पाहण्याची गरज आहे. आज प्रश्न राहुल गांधी विरुद्ध अमित शाह असा नाही. प्रश्न आहे की, विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा आणि लोकशाहीच्या भवितव्याचा! जर विद्यार्थ्यांवर अन्याय झाला असेल तर दोषींवर कारवाई झाली पाहिजे. जर पोलिसांनी नियमबाह्य बळाचा वापर केला असेल तर त्याची जबाबदारी निश्र्चित झाली पाहिजे. जर आरोपांमध्ये तथ्य नसेल तर सरकारने निष्पक्ष चौकशीद्वारे ते स्पष्ट केले पाहिजे. पण सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांना शत्रू समजण्याची मानसिकता संपली पाहिजे. कारण हातात दगड घेऊन उभा असलेला प्रत्येक तरुण गुन्हेगार असेलच असे नाही, कदाचित त्याच्या हातात आधी पुस्तक होते आणि व्यवस्थेने त्याचा आवाज ऐकला नाही म्हणून तो रस्त्यावर आला असेल. त्याच्या डोळ्यात अश्रू असतील, पण त्यामागे कदाचित आपल्या देशाच्या भवितव्याची चिंता असेल.

एखाद्या विद्यार्थ्याच्या डोळ्याला पॅलेट लागल्याचा आरोप हा केवळ एका व्यक्तीच्या जखमेचा प्रश्न नाही. तो संपूर्ण व्यवस्थेच्या संवेदनशीलतेची परीक्षा आहे. त्या डोळ्यातून रक्त आले असेल तर त्या रक्ताचा रंग राजकीय नसतो. तो लालच असतो आणि तो प्रत्येक संवेदनशील भारतीयाच्या अंतःकरणाला प्रश्न विचारतो. विद्यार्थ्यांना लाठी नको, उत्तर हवे आहे. आंदोलनाला दडपशाही नको, संवाद हवा आहे. प्रश्नांना गुन्हा ठरवणे नको, समाधान हवे आहे आणि लोकशाहीला भीती नको, उत्तरदायित्व हवे आहे. राहुल गांधींच्या पत्राने उपस्थित केलेले प्रश्न त्यामुळे केवळ संसद भवनाच्या भिंतीत अडकून राहता कामा नयेत. त्यांची उत्तरे देशाला मिळाली पाहिजेत. निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. दोषी कोणत्याही पदावर असो, त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे आणि जर प्रशासन निर्दोष असेल, तर तेही सत्य पुराव्यांसह जनतेसमोर आले पाहिजे. कारण लोकशाहीचा खरा कस निवडणुकीच्या दिवशी लागत नाही, तो लागतो जेव्हा सत्ता आणि नागरिक आमनेसामने उभे राहतात. त्या क्षणी सत्ता जर संवाद निवडते, तर लोकशाही मजबूत होते. सत्ता जर दडपशाही निवडते, तर लोकशाही कमकुवत होते.

आज देशातील तरुणाई सरकारकडे पाहत आहे. त्यांच्या डोळ्यांत प्रश्न आहेत, त्यांच्या हातात भविष्य आहे आणि त्यांच्या ओठांवर एकच मागणी आहे आम्हाला गप्प करू नका, आमचे ऐका! या आवाजाला उत्तर देणे ही केवळ सरकारची राजकीय जबाबदारी नाही; तर भारतीय लोकशाहीची प्रतिष्ठा जपण्याची राष्ट्रीय जबाबदारी आहे. कारण विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत दिसणारे अश्रू हे केवळ त्यांच्या वेदनेचे प्रतीक नसतात, ते देशाच्या भवितव्याबद्दलच्या त्यांच्या चिंतेचे प्रतिबिंब असतात. लोकशाहीत प्रश्न विचारणारा विद्यार्थी शत्रू नसतो, तो देशाचा भावी नागरिक असतो. त्याच्या हातातील पुस्तक हिसकावून त्याच्या हातात लाठी देण्याची वेळ येऊ नये, एवढीच अपेक्षा. कारण लाठीने आवाज काही काळ दाबता येतो, पण प्रश्न संपवता येत नाहीत. प्रश्नांची उत्तरे द्यावीच लागतात.

आज गरज आहे ती दडपशाहीची नव्हे, संवादाची-संघर्षाची नव्हे, संवेदनशीलतेची आणि आरोप-प्रत्यारोपांची नव्हे, तर पारदर्शक उत्तरदायित्वाची. कारण लोकशाहीचा खरा कस निवडणुकीच्या दिवशी लागत नाही तो लागतो तेव्हा, जेव्हा सत्तेच्या दारात उभा असलेला एक विद्यार्थी थरथरत्या आवाजात विचारतो माझ्या भवितव्याचे काय? त्या प्रश्नाचे उत्तर जर सत्तेने संवादातून दिले, तर लोकशाही जिंकेल आणि जर त्या प्रश्नाला दडपशाहीने उत्तर दिले, तर जखम फक्त विद्यार्थ्याच्या डोळ्याला होणार नाही, ती लोकशाहीच्या अंतरात्म्यावर होईल.

**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

# शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांचा वाढदिवस केज तालुका शिवसेनेच्या वतीने महाआरती करून व विविध कार्यक्रमाने केला साजरा



**केज/प्रतिनिधी :** केज तालुका शिवसेनेच्या वतीने शिवरामपूरी मठ संस्थान वरपगाव येथे माजी मुख्यमंत्री उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त नागेशपूरी महाराज व रामकृष्ण महाराज यांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेऊन महाआरती चा कार्यक्रम करण्यात आला. यावेळी महंत भगवान महाराज शास्त्री वपरगावकर,जिल्हा प्रमुख रत्नाकर आपा शिंदे व तालुका प्रमुख अशोक जाधव,केज शहर प्रमुख तात्या रोडे, उपशहर प्रमुख पपु कोल्हे, उपतालुका प्रमुख तानाजी धस,विधानसभा संघटक लक्ष्मण तात्या गलांडे,तालुका सचिव आपा कांबळे, शिवसैनिक मारुती गव्हाने , राजाभाऊ मोटे,उपशाखा प्रमुख अरुण देशमुख, आण्णातात्या देशमुख,रमेश देशमुख,शाखा सचिव बालासाहेब देशमुख,रावण गळफाडे,ह.भ.प भागताजी देशमुख व समस्त शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आयुष्य जगताना जे आपल्याला रडवतात तेच, आपलं आयुष्य घडवतात!- समाजभूषण उत्तमराव तरकसे







**माजलगाव/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात योगेश्वरी मोटर ड्रायव्हिंग स्कूल गजानन नगर माजलगाव व समाजभूषण उत्तमराव तरकसे सामाजिक व शैक्षणिक प्रतिष्ठान आंबेजोगाई ता, आंबेजोगाई जि, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्ह्यातील युवा पिढी व खास करून विद्यार्थी विद्यार्थिनी करिता व्यसनमुक्ती व रस्ता सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र पोलीस दलात कार्यरत असलेले स्थित कार्यरत नवी मुंबई क्राईम ब्रँचचे अधिकारी समाजभूषण मा श्री उत्तमराव दासू तरकसे आसरडोहकर (महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ साहित्यिक कवी विचारवंत) हे आयोजकाच्या आग्रहास मान देऊन उपस्थित राहिले व सध्याच्या युवा पिढीला व विद्यार्थी विद्यार्थिनीला व्यसनमुक्त राहण्याचे व रस्ता सुरक्षा नियमाची माहिती देत आपल्या कुटुंबाची काळजी घ्या म्हणजे तुम्ही आपोआप स्वतःची काळजी घ्याल तसेच वाहतुकीचे नियम सुध्दा पाळाल व व्यसनमुक्त राहाल असे मार्गदर्शन करत आयुष्य जगताना जे आपल्याला रडवतात तेच आपलं आयुष्य घडवतात! असे प्रबोधनात्मक विचार मांडले

सदर कार्यक्रमास आयोजकाचे निमंत्रण स्वीकारून समाजभूषण उत्तम तरकसे उपस्थित झाल्याने योगेश्वरी मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे संस्थापक मा श्री दत्तात्रय क्षीरसागर व विश्र्वनाथ शिंदे यांनी समाजभूषण उत्तम तरकसे यांचे आभार मानत शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले व उपस्थित बीड जिल्ह्यातील सर्व युवा पिढी व विद्यार्थी विद्यार्थिनीचे तसेच उपस्थित शिक्षकगण व प्राध्यापक वर्गाचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली

# राजर्षी शाहू प्राथमिक विद्यालयात वारकरी दिंडी सोहळा उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी :** आषाढी एकादशीचे औचित्य साधून पटेल नगर येथील राजर्षी शाहू प्राथमिक विद्यालयाचा वारकरी दिंडी सोहळा भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक विकास तोडकर यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणीच्या पालखीचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी शाळेतील शिक्षक संजय कुमार बेलुरे, गोविंद मुस्कावाड, निवृत्ती जाधव, सरस्वती केंद्रे, वर्षा दैठणकर, सारिका गडकर, सुरेखा भुरे सह विद्यार्थी वारकरी वेशभूषेत उपस्थित होते. अत्यंत भक्तीपूर्ण वातावरणात दिंडी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, विठ्ठल-रुक्मिणी आदींची वेशभूषा साकारून टाळ-मृदुंगाच्या गजरात व विठ्ठल नामाच्या जयघोषात शाळा परिसरातून दिंडी काढली. "जरा अलीकडे ये, मला पलीकडे ने पांडुरंगा... नदी भरली चंद्रभागा" या गीतावर विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य विशेष आकर्षण ठरले. पालखी पूजन, रिंगण सोहळा आणि विठ्ठल-रुक्मिणीच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# अर्चना मोरे यांचे केज तहसील कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरु




**केज/प्रतिनिधी :** कायद्याच्या दारात ओरडून ओरडून, वारंवार खेटे घालुन देखील न्याय मिळत नसल्याने अखेर केज येथील सौ.अर्चना मोरे यांनी तहसील कार्यालयासमोर दिनांक २७ जुलै २०२६ सोमवार पासून बेमुदत आमरण उपोषण सुरू आहे. मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण सोडणार नाही असा निर्धार उपोषणकर्त्या सौ.अर्चना मोरे यांनी केला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की,सौ.अर्चना पिंटू मोरे रा. महात्मा फुले नगर केज यांचे कुटूंबावर गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्याच नातेवाईकांकडून स्वातंत्र्याने अन्याय होत असुन सदरील व्यक्ती वीरोधात केज पोलिसांत अनेक तक्रारी दिलेल्या आहेत.मात्र या घटनेची पोलिसांनी गांभिर्याने दखल न घेतल्याने आरोपीचे मनोबल वाढते असुन पोलिस ठाण्याचे दरवाजाला खेटे मारुन कंटाळल्याने अखेर केज येथे वास्तव्यास असणाऱ्या सौ.अर्चना पिंटू मोरे यांनी अखेर उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे. त्यांनी काल दि.२७ जुलै २०२६ सोमवार रोजी पासून केज तहसील कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास सुरू केले असून त्यांनी दिनांक २७ जुलै २०२६ रोजी केज तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की,

केज पोलीस ठाणे येथील गु.र.नं.१८७/२०२६ या गुन्ह्यातील आरोपी गोविंद किसनराव कोंबडे व तपासी अधिकारी श्री.राजू वाघमारे यांच्यासह इतर जन हे बियरबार मध्ये मद्यपान करतानाचे सीसीटीव्ही फुटेज तपासून संबंधित दोषीवर तात्काळ कार्यवाही करून तपासी अधिकारी श्री.वाघमारे यांना तात्काळ निलंबित करून त्यांना कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ करण्यात यावे.

सदरील गुन्ह्यातील आरोपी गोविंद कोंबडे याच्या विरोधातील गुन्ह्याची पार्श्र्वभूमी तपासून तात्काळ बीड जिल्ह्यातून हद्दपार करण्यात यावे. आरोपी गोविंद कोंबडे व त्याची पत्नी आणि तपासी अधिकारी श्री.वाघमारे यांचे कॉल डिटेल्स,सीडीआर तपासण्यात यावेत. आरोपी गोविंद कोंबडे यांच्यापासून व त्याच्या मित्र परिवाराकडून माझ्या व माझ्या कुटुंबाच्या जीवितास धोका असून आम्हाला पोलीस संरक्षण देण्यात यावे या मागण्यांसाठी उपोषण कार्यकर्त्या सौ. अर्चना पिंटू मोरे या सोमवारपासून बेमुदत आमरण उपोषणास बसलेल्या आहेत.

# केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ परीक्षा जिल्ह्यातील एका परीक्षा केंद्रावर २८ जुलै, २०२६ या कालावधीत सकाळी १०.३० ते दुपारी १.३० या कालावधीत घेतली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर परीक्षा सुरळीत व शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी लातूरचे जिल्हादंडाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरामध्ये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थींशिवाय अन्य पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्रित प्रवेश करण्यास तसेच कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास व शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच परीक्षा कालावधीत केंद्राच्या १०० मीटर परिसरातील सर्व झेरॉक्स सेंटर्स, दुकाने, पानटपऱ्या, टायपिंग सेंटर्स, एसटीडी बुथ आणि ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय परीक्षा केंद्र परिसरात मोबाईल फोन, सेल्यूलर फोन, ई-मेल व इतर प्रसार माध्यमे घेऊन जाण्यास बंदी घालण्यात आली असून, कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला किंवा वाहनाला प्रवेश दिला जाणार नाही. हे प्रतिबंधात्मक आदेश २८ जुलै २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत लागू राहतील. परीक्षा उपकेंद्रावर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी, परीक्षार्थी, निगराणी अधिकारी आणि पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या शासकीय कर्तव्ये पार पाडण्याच्या अनुषंगाने या आदेशातून वगळण्यात आले आहे.

# एक लाख नागरिकांपर्यंत पोहोचणार प्लास्टिकमुक्त भारताचा निर्धार!




**लातूर/प्रतिनिधी :** आपले आरोग्य, आपली जबाबदारी या सामाजिक अभियानांतर्गत प्लास्टिकमुक्त भारत अभियान राबविण्यात येत असून, दयानंद महाविद्यालयासमोरील भाजीपाला बाजारात नागरिकांमध्ये प्लास्टिकविरोधी जनजागृती करण्यात आली.

यावेळी भाजीपाला खरेदीसाठी आलेल्या नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. तसेच अनेक नागरिकांच्या हातातील प्लास्टिक कॅरीबॅग काढून त्याऐवजी कापडी पिशवी देण्यात आली आणि प्लास्टिकच्या वापरामुळे पर्यावरण, आरोग्य व पशुपक्ष्यांवर होणारे दुष्परिणाम सविस्तर समजावून सांगण्यात आले. नागरिकांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत भविष्यात कापडी पिशवीच वापरण्याचा संकल्प व्यक्त केला.

या अभियानाचे प्रमुख सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम पार पडला. यामध्ये लोकशाही जिल्हा प्रतिनिधी चॅनलचे सचिन अंकुलगे, एनसीआयबी न्यू दिल्ली, शाखा लातूर जिल्हा संचालक तथा संपादक शिरीषकुमार शेरखाने, वीरभद्र तरगुडे, संपादक रामजी रोडगे आणि योगानंद जोशी यांनी सक्रिय सहभाग घेतला.

या अभियानाअंतर्गत आतापर्यंत ५,००० हून अधिक नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले असून, प्रत्येकाला प्लास्टिकमुक्त जीवनशैलीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले आहे. अभियानाचे पुढील उद्दिष्ट एक लाख नागरिकांपर्यंत कापडी पिशवी पोहोचवून प्लास्टिकमुक्त भारताचा संदेश घराघरात पोहोचवणे हे आहे.

सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, प्लास्टिकला नकार आणि कापडी पिशवीचा स्वीकार हा प्रत्येक नागरिकाने केला, तर पर्यावरण संवर्धनाबरोबरच आपल्या आरोग्याचेही संरक्षण होईल. प्लास्टिकमुक्त भारत घडविण्यासाठी प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करावी.असे आव्हान याप्रसंगी करण्यात आले.

# संगमेश्वर विद्यामंदिरची शिष्यवृत्ती परीक्षेत भरारी



**लातूर/प्रतिनिधी :** शहरापासून जवळच असलेल्या आर्वी शिवारातील सोमवंशीनगरातील संगमेश्वर प्राथमिक विद्यामंदिरने इयत्ता ४थी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करीत उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत शाळेतील १२ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून या यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

रुद्राणी संगमनाथ बिराजदार ही विद्यार्थिनी २२४ गुण मिळवत विद्यालयात प्रथम, श्रुती दत्ता जाधव २२२ द्वितीय, तर राजनंदिनी लिंबाजी जाधव ही २१८ गुण मिळवत तृतीय आली आहे. यासोबतच संस्कृती किरण मुंडे व प्रणव मनोज सिरसाठ यांनी प्रत्येकी २१६, साई संभाजी काळे २१४, अंजली अंगद राऊत २०८, वैष्णवी कोंडीबा कोलमवाड २०४, निकिता अनिल गवळी १९६, गौरव शिवाजी सूर्यवंशी १९०, त्रिरत्न दुष्यंत साळवे १८६ व कुणाल गोकुळसिंग बायस याने १८४ गुण मिळवत शाळेचा गौरव वाढविला आहे. या विद्यार्थ्यांना डी. एस. भदभदे, जे. जी. कावळे, जी. बी. मोरे व ए. व्ही. माने या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल शिक्षक आमदार विक्रम काळे, शिक्षणाधिकारी प्रमोद पवार, संस्थाध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, सहसचिव राजेंद्र जायेभाये, कोषाध्यक्ष कविता केंद्रे, संचालक सोनिया जायेभाये, मुख्याध्यापक अविनाश पवार यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले आहे.

# घोटी-सिन्नर फाटा उड्डाणपुलावर ट्रक दुभाजकाला धडकून उलटला अनब... महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी

**घोटी/प्रतिनिधी :** नाशिक-मुंबई महामार्गावर घोटी-सिन्नर फाटा उड्डाणपुलावर आज एक भीषण अपघात घडला. विटांनी भरलेला एक भरधाव ट्रक चालकाचे नियंत्रण सुटल्याने थेट दुभाजकाला धडकून महामार्गावरच पलटी झाला. या अपघातात ट्रकचे मोठे नुकसान झाले असून ट्रकमधील शेकडो विटा महामार्गावर विखुरल्या. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, ज्याम ुळे एक मोठा अनर्थ टळला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, विटांची वाहतूक करणारा हा ट्रक नाशिकच्या दिशेने जात असताना घोटी-सिन्नर फाटा येथील उड्डाणपुलावर आला असता, अचानक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. नियंत्रण सुटल्याने भरधाव ट्रक थेट रस्त्यावरील दुभाजकावर जाऊन आदळला आणि मोठ्या आवाजासह रस्त्याच्या मधोमध पलटी झाला. अपघाताचा आवाज इतका मोठा होता की, आसपासचे नागरिक आणि इतर वाहनचालक तातडीने मदतीसाठी धावले. ट्रक पलटी झाल्यामुळे त्यामध्ये असलेल्या हजारो विटा नाशिक-मुंबई महामार्गावर पसरल्या. यामुळे मुख्य रस्त्यावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस केंद्र (घोटी) आणि घोटी पोलीस ठाण्याचे कर्मचारी व बचाव पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

पोलीसांनी घटनास्थळी पोहोचून सुरक्षेच्या कारणास्तव तत्काळ परिसराची नाकाबंदी केली आणि महामार्गावर विखुरलेल्या विटा हटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले. वाहनांची लांबच लांब रांग लागू नये म्हणून पोलीसांनी वाहतूक दुसऱ्या बाजूने वळवून सध्या एकेरी मार्गाने वाहतूक पूर्ववत सुरू केली आहे. महामार्गावरून अपघातग्रस्त ट्रक आणि विटा बाजूला करण्याचे काम वेगाने सुरू असून लवकरच दोन्ही मार्गिका पूर्णपणे म ोकळ्या केल्या जातील, अशी माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# आषाढी एकादशी निमित्त श्री. कलोपासक प्रतिष्ठानची तालुकास्तरीय भजन स्पर्धा उत्साहात संपन्न

**केज/प्रतिनिधी :** आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने श्री.कलोपासक प्रतिष्ठान, केज यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली तालुकास्तरीय भजन स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. वय वर्षे ६ ते १६ या वयोगटातील बालस्पर्धकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला तालुकाभरातून मोठा प्रतिसाद लाभला. एकूण ३६ स्पर्धकांनी सहभाग घेत आपल्या सुरेल आवाजाने आणि भावपूर्ण सादरीकरणाने उपस्थित रसिकांची मने जिंकली.

बालवयातच भजन, अभंग आणि वारकरी परंपरेची गोडी निर्माण व्हावी, तसेच नवोदित कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने प्रतिष्ठानने या स्पर्धेचे आयोजन केले होते. प्रत्येक स्पर्धकाने उत्कृष्ट सादरीकरण करून परीक्षकांसमोर आपल्या गायनकलेची छाप पाडली. त्यामुळे स्पर्धा अत्यंत चुरशीची झाली.

स्पर्धेचा निकाल जाहीर करताना प्रथम क्रमांक कु. शाश्र्वती उदय कुंभकर्ण, द्वितीय क्रमांक कु. सुनिष्ठा उमाकांत बोधणे, तर तृतीय क्रमांक चि. अगस्त्य अशोक सोनवणे याने पटकावला. उत्तेजनार्थ पुरस्कार कु. आरोही अशोक मेटे हिला प्रदान करण्यात आला. स्पर्धेसाठी प्रा. बालाजी मानगिरे (बीड) व प्रा. प्रसाद कुलकर्णी (जवळबन) यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली.

त्यांनी स्पर्धकांच्या सादरीकरणाचे गायन, स्वर, ताल, उच्चार आणि भावसंपन्नता या निकषांवर परीक्षण केले. पवन चंदनशिव व पद्मनाभ देव यांच्या बहारदार साथीने कार्यक्रमाची रंगत अधिक खुलली. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम, प्रमाणपत्रे आणि स्मृतिचिन्हे ह.भ.प.केशव महाराज शास्त्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

यावेळी श्रीमती शोभा केजकर,शामराव काळे, संजय पोरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि मोठ्या संख्येने पालक व रसिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभय कुंभकर्ण यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. कलोपासक प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकारी, सदस्य आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देव यांनी सांगितले की, वारकरी परंपरा, भक्ती आणि सांस्कृतिक मूल्ये जपण्यासाठी तसेच बालकलावंतांना प्रोत्साहन देण्यासाठी भविष्यातही अशाच विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल. ही स्पर्धा केवळ एक सांगीतिक स्पर्धा न ठरता, बालकलावंतांमधील भक्तीभाव, आत्मविश्र्वास आणि कलागुणांना वाव देणारा संस्मरणीय सांस्कृतिक सोहळा ठरला.



# मोफत पंढरपूर वारीला याही वर्षी उत्स्फूर्त प्रतिसाद

– ग्रामीण व शहरी भागातील ३०१ वारकरी ६ ट्रॅव्हल्स – मोफत पंढरपूर वारी उपक्रमाचे ६ वे वर्ष






**लातूर/प्रतिनिधी :** माझं लातूर परिवाराने हाती घेतलेल्या मोफत पंढरपूर वारी उपक्रमाअंतर्गत रुद्राक्ष ट्रॅव्हल्सच्या वतीने ग्रामीण व शहरी भागातील ३०१ भाविक वारकऱ्यांना ६ ट्रॅव्हल्सच्या माध्यमातून वारी घडवून आणण्यात आली. सकाळी ७.०० वाजता शहरातील यशवंतराव चव्हाण संकुल येथून विठ्ठलाच्या दर्शनासाठी ३०१ वारकरी पंढरपूरकडे मार्गस्थ झाले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते वाहनांची पूजा करून वारकऱ्यांना रवाना करण्यात आले.

मोफत पंढरपूर वारी या उपक्रमात प्रामुख्याने पानगाव, भोईसमुद्रगा, जवळा, गाधवड, तांदुळजा, रांजणी, घारगाव, शिराढोण, चौसाळा या ग्रामीण भागातील आणि शहरातील भाविक वारकऱ्यांचा समावेश होता. प्रवासादरम्यान सर्व भाविकांच्या फराळाची उत्तम सोय देखील अगदी मोफत करण्यात आली होती. या धार्मिक उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी माझं लातूर परिवाराचे सक्रिय सदस्य तथा रुद्राक्ष ट्रॅव्हल्सचे संचालक सोमनाथ मेदगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# संयुक्त युवा शासन प्रतिष्ठान चे सं. अध्यक्ष सुबोध महाळंगीकर यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा







**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते सुबोध महाळंगीकर यांनी आपल्या वाढदिवसाचा व्यर्थ खर्च टाळुन विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला आहे यामध्ये शासकीय रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांना अखंड अन्नसेवा चालू केले आहे गरजू विद्यार्थ्यांना विविध शालेय साहित्य वाटप करण्यात आले रक्तदान चळवळ गतिमान करण्यासाठी त्यांच्या मित्र परिवाराच्या वतीने ३१ रक्तदात्यांनी रक्तदान करून वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी उपस्थित विवेक हणवते,अभि सूर्यवंशी, महेश सूर्यवंशी,गणेश पवार, संदीप लांडगे, सुशांत महालंगीकर, महादेव कांबळे, आशू घाडगे, शिव आलटे,यश सरवदे,जय सुरवंशी, हर्षवर्धन लोकरे, पृथ्वी, मुकुंद बुडुरूपे,आविष्कार कांबळे, विजय कोकाटे, सिद्धांत उबाळे,माधू काकरे,प्रथमेश रेड्डी,मंथन राठोड आदी उपस्थित होते

# मुंबई-अहमदाबाद महामार्गावर भीषण वाहतूक कोंडी; चाकरमान्यांचे मोठे हाल

वसई : मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर सोमवारी सकाळी भीषण वाहतूक कोंडी निर्माण झाली असून यामुळे प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. वसई पूर्वेच्या भागातून जाणाऱ्या या महामार्गावर मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या वाहिनीवर (मुंबई वाहिनी) सकाळपासूनच घोडबंदर रोड ते ससूनवघर आणि म ालजीपाडा दरम्यान वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

घोडबंदर रोड आणि वर्सोवा पुलापासून सुरू झालेली ही कोंडी मालजीपाडापर्यंत पोहचली असून महामार्गावर वाहने अतिशय धिम्या गतीने सरकत आहेत. हा महामार्ग मुंबई, ठाणे, वसई-विरार, मिरा-भाईदर, पालघर आणि गुजरात यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या भागांना जोडणारा मुख्य मार्ग मानला जातो

# बीएसआय मिशन २५ अंतर्गत औसा तालुक्याची आडवा बैठक संपन्न ५६ गावामध्ये वर्षावास राबवून बीएसआय मिशनचे उद्दिष्ट पूर्ण करावे

## जिल्हा सचिव तथा माजी गटशिक्षणाधिकारी प्रेमनाथ कांबळे





**औसा/प्रतिनिधी :** भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा लातूर पश्रि्चमच्या अंतर्गत तालुका शाखा औसा शाखेची बैठक तक्षशिला बुद्धविहार याकतपूर रोड औसा येथे आयोजित करण्यात आली होती या बैठकीत सर्वप्रथम तथागत बुद्ध व बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्रिसरण पंचशील घेऊन कार्यक्रमला सुरुवात करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांच्या सत्कार करण्यात आला. इडख मिशन २५ अंतर्गत अढावा बैठक बैठकीला मार्गदर्शन म्हणून. जिल्हा सरचिटणीस अभिमन्यू लामतुरे, जिल्हा उपाध्यक्ष प्रचार व पर्यटन राजेंद्र क्षीरसागर, जिल्हा संघटक तथा औसा तालुका प्रभारी विलास आल्टे, जिल्हा हिशोब तपासणी राजाभाऊ उबाळे यांच्या प्रमुख उपस्थिती होती. ५६ प्रत्येक गावातील बौद्ध विहार किंवा समाज समाज मंदिरात बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित भगवान बुद्ध व त्याचा धम्म या ग्रंथाचे वाचन व केंद्रीय कार्यालयाने ठरवून दिलेले वर्षावास प्रवचन मालिकेतील विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती सर्व मंडळ व समविचारी संघटन, बौद्ध उपासक-उपासिका यांना सोबत घेऊन दिनांक २९ जुलै २०२६ पासून आषाढी पौर्णिमा ते अश्रि्वनी पौर्णिमेपर्यंत प्रत्येक गावामध्ये वर्षावास सुरू करावे असे आवाहन करण्यात आले.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी औसा तालुकाध्यक्ष कैलास सोनकांबळे हे होते तर, बैठकीचे प्रस्ताविक सरचिटणीस दिलीप बौद्धवीर, सूत्रसंचालन कोषाध्यक्ष मारुती कांबळे येळीकर, संस्कार उपाध्यक्ष लिंबराज गोरे, प्रचार व पर्यटन सचिव बळीराम गरड, संरक्षण उपाध्यक्ष आयु शाम सुरवसे, सचिव रंगनाथ कांबळे, कार्यालयीन सचिव राजेंद्र (आबा) बनसोडे, आयु दत्तात्रय सोनकांबळे,मोहन गायकवाड, कमलाकर माने, संघटक दगडू घोडके, धम्मयान वाचक सभासद सूर्यकांत वाघमारे शिवली , बालाजी टेकाळे वाघोली, माजी तालुकाध्यक्ष रावसाहेब सूर्यवंशी उपस्थित होते.

# राजर्षी शाहू प्राथमिक शाळेची विद्यार्थिनी कु. आरोही गाडेकरचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश



**लातूर/प्रतिनिधी :** शासनाकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत पटेल नगर येथील राजर्षी शाहू प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. वर्गशिक्षक वर्षा दैठणकर यांच्या मार्गदर्शनाखाली वेळोवेळी केलेल्या सुयोग्य नियोजनानुसार शाळेत शिष्यवृत्ती परीक्षार्थींची तयारी करण्यात आली होती.

तसेच सरस्वती केंद्रे व सुरेखा भुरे मॅडमचे गणित व मराठी विषयात महत्वाचे योगदान लाभले. या परीक्षेचा दिनांक २५ जुलै रोजी निकाल जाहीर झाला असून शाळेतील विद्यार्थी कु. आरोही महेश गाडेकर १३२ गुण घेऊन शिष्यवृत्तीस पात्र ठरली आहे. आरोहीला शिष्यवृत्ती परीक्षेत मिळालेल्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष उद्धवराव जाधव, सचिव ललिता जाधव, मुख्याध्यापक विकास तोडकर, वर्गशिक्षक वर्षा दैठणकर तसेच शाळेतील सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

# शालेय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी तालुका व महानगरपालिकास्तरीय स्पर्धापूर्व बैठकांचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद व लातूर महानगरपालिका लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२६-२०२७ या वर्षातील शालेय तालुकास्तर, जिल्हास्तर व महानगरपालिकास्तर क्रीडा स्पर्धांच्या आयोजन नियोजनासाठी स्पर्धापूर्व बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे.

यानुसार अहमदपूर तालुक्याची बैठक ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता अहमदपूर येथील अहिल्यादेवी होळकर विद्यालय येथे, चाकूर तालुक्याची बैठक ३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ वाजता चापोली येथील संजीवनी विद्यालय येथे, जळकोट तालुक्याची बैठक ४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता जळकोट येथील महात्मा फुले महाविद्यालय येथे, तर देवणी व उदगीर या दोन्ही तालुक्यांसाठी ४ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ वाजता उदगिरी महाविद्यालय येथे बैठक पार पडणार आहे.

तसेच निलंगा व शिरूर अनंतपाळ या दोन्ही तालुक्यांसाठी ५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालय येथे, औसा तालुक्यासाठी ५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ वाजता आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी येथे, लातूर व रेणापूर या दोन्ही तालुक्यांसाठी ६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता लातूर येथील डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूल येथे आणि लातूर शहर महानगरपालिकास्तरासाठी ६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ वाजता लातूर येथील स्वामी विवेकानंद विद्यालय एम.आय.डी. सी. येथे सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

शालेय क्रीडा स्पर्धांचे नियोजन सुरळीत व वेळेत व्हावे याकरिता जिल्ह्यातील जास्तीत जास्त शाळा, महाविद्यालये आणि क्रीडा शिक्षकांनी या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन लातूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी जयराज मुंढे यांनी केले आहे.

# उमेदच्या माध्यमातून राज्यात महिला बचत गट नोंदणी व १ कोटी लखपती दीदी संकल्प अभियान

**मुंबई :**ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक सबलीकरण आणि सर्वांगीण विकास साधण्यासाठी ग्राम विकास विभागाने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत 'महिला बचत गट नोंदणी मोहीम व १ कोटी लखपती दीदी संकल्प अभियान' राबविण्याचा शासन निर्णय १७ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध केला आहे. सन २०२६ ते २०२९ या कालावधीत हे अभियान राज्यभर प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती उमेदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर डुबे पाटील यांनी दिली आहे.

या अभियानांतर्गत अद्याप कोणत्याही स्वयं सहाय्यता (बचत) गटाशी जोडल्या न गेलेल्या ग्रामीण महिलांची नोंदणी करण्यात येणार आहे. विशेषतः हंगामी स्थलांतरित महिला, ऊसतोड कामगार, वीटभट्टी कामगार; तसेच सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील महिलांना ग्रामसखी आणि समुदायस्तरीय संस्थांच्या माध्यमातून प्राधान्याने बचत गटांशी जोडले जाणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात ६ कोटी लखपती दीदी घडविण्याचा संकल्प केला आहे. त्याला गती देत महाराष्ट्रातील १ कोटी ग्रामीण महिलांना लखपती दीदी बनविण्याचा संकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. ग्राम विकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वात आणि राज्यमंत्री योगेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उमेद हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे श्रीधर डुबे पाटील यांनी सांगितले.

ग्राम विकास व पंचायतराज विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार यांनी सांगितले की, जुलै ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत राज्यभर व्यापक जनजागृती मोहीम आणि क्षमता बांधणी कार्यशाळा आयोजित करण्यात येतील. या माध्यमातून स्थानिक समुदाय संस्था आणि महिलांना अभियानाच्या विविध टप्प्यांचे प्रशिक्षण दिले जाईल.

या अभियानाद्वारे महिलांना केवळ बचत गटात सहभागी करून घेणे एवढ्यावर मर्यादित न राहता, विविध शासकीय योजनांचा कृतिसंगम साधून त्यांना कौशल्य विकास, वित्तीय सेवा तसेच त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे महिलांच्या उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक समृद्धीचा मार्ग मोकळा होणार आहे.

**सविस्तर मार्गदर्शक सूचना**

अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, नवी मुंबई यांच्या स्तरावरून सविस्तर मार्गदर्शक सूचना सुद्धा निर्गमित करण्यात आल्या आहेत. या उपक्रमामुळे ग्रामीण महिलांच्या जीवनात आत्मसन्मान, स्वावलंबन आणि आर्थिक स्थैर्याचे नवे पर्व सुरू होईल, असा विश्वास सचिव चंद्रकांत पुलकुंडवार यांनी व्यक्त केला.

**महिलांना सहभागाचे आवाहन**

ग्रामीण भागातील बचत गटात अद्याप सहभागी न झालेल्या सर्व पात्र महिलांनी या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा आणि मोठ्या संख्येने बचत गटांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन उमेद अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर डुबे पाटील यांनी केले आहे.

# महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत हॅलो किड्स इंग्लिश स्कूल, शेडोळचा घवघवीत यशाचा झेंडा!

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद , पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत हॅलो किड्स इंग्लिश स्कूल, शेडोळ येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवत शिष्यवृत्ती परीक्षेत उज्ज्वल कामगिरी केली असून संपूर्ण परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामागे त्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. शाळेतील गुणवत्तापूर्ण अध्यापन, नियमित सराव चाचण्या व विद्यार्थीकेंद्रित शिक्षणपद्धतीमुळे हे यश शक्य झाल्याची भावना शाळा व्यवस्थापनाने व्यक्त केली.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष मा. माधवजी दूधभाते, शालेय समिती अध्यक्ष ॲड.नितेश दुधभाते तसेच मुख्याध्यापिका सौ. मनीषा दोडके, अकॅडमिक कोऑर्डिनेटर विवेक कांबळे, शाळा व्यवस्थापन, शिक्षकवृंद तसेच ग्रामस्थांनी मनःपूर्वक अभिनंदन केले असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

हॅलो किड्स इंग्लिश स्कूल, शेडोळने अल्पावधीतच शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटवला असून आगामी काळातही अशाच यशस्वी विद्यार्थ्यांची परंपरा अधिक बळकट करण्याचा निर्धार शाळा व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.

# लातूर जिल्ह्यात खरीप २०२६ साठी सुधारीत प्रधानमंत्री पिक विमा योजना लागू; ३१ जुलैपर्यंत अर्जाचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** सन २०२६-२७ या वर्षापासून राज्य शासनाने खरीप हंगामापासून सुधारीत प्रधानमंत्री पिक विमा योजना लागू केली आहे. लातूर जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसाठी या योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ ही निश्चित करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना ई-पिक पाहणी करणे आणि फार्मर आयडी उपलब्ध करून देणे अनिवार्य करण्यात आले आहे. ही योजना अधिसूचित महसूल मंडळात अधिसूचित केलेल्या पिकांसाठीच लागू असणार असून, ती कर्जदार व बिगर कर्जदार अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांसाठी पूर्णपणे ऐच्छिक आहे. लातूर जिल्ह्यामध्ये या योजनेची अंमलबजावणी एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, पुणे यांच्यामार्फत केली जात आहे.




या योजनेअंतर्गत विविध पिकांसाठी ७० टक्के जोखीम स्तरावर विमा संरक्षण आणि शेतकऱ्यांनी भरावयाचा हप्ता निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये सोयाबीन पिकासाठी प्रति हेक्टरी ६२ हजार ५०० रुपये विमा संरक्षित रक्कमेसाठी शेतकऱ्यांना १ हजार २५० रुपये हप्ता भरावा लागेल. कापूस पिकासाठी ६२ हजार रुपये संरक्षणासाठी १ हजार ५४३ रुपये ८० पैसे, तर तूर पिकासाठी ४७ हजार रुपये संरक्षणासाठी ९४० रुपये हप्ता निश्चित केला आहे. याशिवाय खरीप ज्वारीसाठी ३३ हजार रुपये रक्कमेसाठी ६६० रुपये, बाजरीसाठी ३२ हजार रुपये रक्कमेसाठी ६४० रुपये, मूग पिकासाठी ३० हजार रुपये रक्कमेसाठी ४५० रुपये आणि उडीद पिकासाठी २७ हजार रुपये विमा संरक्षित रक्कमेसाठी प्रति हेक्टरी ४०५ रुपये विमा हप्ता शेतकऱ्यांना भरावा लागणार आहे.

खरीप २०२६ च्या हंगामात पिकांची उत्पादन आधारित नुकसानभरपाई निश्चित करताना एक महत्त्वाची सुधारणा करण्यात आली आहे. महसूल मंडळ व तालुका स्तरावरील पिक कापणी प्रयोगाच्या आधारे सरासरी उत्पादन काढताना, निवडक पिकांच्या बाबतीत रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाद्वारे प्राप्त उत्पादनास ५० टक्के आणि प्रत्यक्ष पिक कापणी प्रयोगाद्वारे प्राप्त उत्पादनास ५० टक्के भारांकन देऊन पिकाचे सरासरी उत्पादन निश्चित केले जाणार आहे.

शासनाने या योजनेत होणाऱ्या संभाव्य गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कडक नियमावली तयार केली आहे. योजनेत कोणत्याही अवैध मार्गाने किंवा बोगस पद्धतीने पिक विमा काढल्याचे आढळून आल्यास संबंधित अर्ज तात्काळ रद्द केला जाईल. तसेच संबंधित खातेदारास काळ्या यादीत टाकून पुढील ५ वर्षांकरिता कृषी विभागाच्या कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळण्यापासून वंचित ठेवले जाईल.

शेतकऱ्यांनी शेवटच्या टप्प्यात होणारी गर्दी आणि घाई टाळून वेळेतच आपल्या अधिसूचित पिकांच्या विमा संरक्षणासाठी नजीकच्या बँकेत किंवा नागरी सुविधा केंद्रात संपर्क साधून प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी केले आहे. योजनेबाबत काही अडचण आल्यास शेतकरी संबंधित विमा कंपनी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, नजीकची बँक किंवा १४४४७ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधून मार्गदर्शन घेऊ शकतात.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.